# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ९० वा ❑ भारतीय सौर दिनांक २७ वैशाख शके १९४८, रविवार दि.१७ मे २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## जागतिक बाजारात इंधन महागले, पण भारतात अच्छे दिन?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ आणि देशांतर्गत पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे भारतात अच्छे दिन नसून महागाईचे आव्हान कायम आहे. पश्चिम आशियातील तणावामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाचा भाव प्रति बॅरल ७० डॉलरवरून १२० डॉलरपर्यंत पोहोचला आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात दर वाढले असले तरी, तेल विपणन कंपन्या कंपन्यांना होणारे नुकसान टाळण्यासाठी पंपवरील दरांमध्ये टप्प्याटप्प्याने वाढ करत आहेत.केंद्र सरकार सध्या पेट्रोलवर सीमाशुल्क किंवा उत्पादन शुल्क गोळा करत नाही, ज्यामुळे ग्राहकांना थेट दरवाढीचा पूर्ण फटका बसत नाही.

कंपन्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ ते ५ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. इंधन महागल्यामुळे वाहतूक, मालवाहतूक आणि भाजीपाल्यापासून ते रोजच्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढून सामान्य नागरिकांचे बजेट कोलमडले आहे.

इंधन दर वाढले हे मान्य करत असताना इतर देशांच्या तुलनेत भारतात इंधनाच्या दरात फारशी वाढ झाली नाही, हे देखील तितकेच सत्य आहे.

अनेक आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे (उदा. पश्चिम आशियातील संघर्ष) जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या होत्या परंतु, इंधनाच्या दरांमध्ये सर्वात कमी वाढ करणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारत अग्रस्थानी आहेभारतात झालेली वाढ: भारतात पेट्रोल केवळ ३.२% आणि डिझेल ३.४% ने महागलेइतर देशांमधील वाढ: याउलट, म्यानमारमध्ये ८९.७%, मलेशियात ५६.३%, पाकिस्तानात ५४.९% आणि अमेरिकेत ४४.५% ने पेट्रोलच्या किमती वाढल्या

शेजारील देशांमधील भीषण परिस्थिती:जागतिक इंधन संकटामुळे भारताच्या शेजारील देशांमध्ये इंधनाचे दर ६० टक्क्यांपर्यंत वाढले. पाकिस्तानात इंधनाचे दर विक्रमी पातळीवर पोहोचले असून, तिथे इंधन वाचवण्यासाठी आठवड्यातून केवळ ४ दिवस काम करण्याचा नियम लागू करावा लागला होता. नेपाळ आणि श्रीलंकेतही इंधन दरवाढीमुळे महागाई प्रचंड वाढली होती.

भारत आपल्या गरजेच्या ८५ टक्क्यांहून अधिक कच्चे तेल आयात करतो असे असूनही, केंद्र सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्कात मोठी कपात करून तसेच सरकारी तेल कंपन्यांना स्वतः चे नुकसान सहन करायला लावून नागरिकांना दरवाढीपासून वाचवले आहे.

भविष्यातील आव्हाने: कंपन्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी पंपच्या किमतीत अजूनही २० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.






# साहित्य भारतीच्या जिल्हाध्यक्षपदी प्रा. विजय पोहनेरकर

## महेश खरात, प्रिया धारुरकर, दीपाली कुलकर्णी यांचा कार्यकारिणीत समावेश



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - साहित्य भारतीच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी सुप्रसिद्ध हास्यकवी प्रा. विजय पोहनेरकर तर कार्याध्यक्षपदी प्रा. डा. महेश खरात यांची निवड करण्यात आली आहे.

प्रांत कार्याध्यक्ष उमेश काळे यांनी जिल्हा कार्यकारिणी गुरुवारी घोषित केली. हसू आणि आसू च्या माध्यमातून प्रा. पोहनेरकर यांनी कवितेच्या क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. प्रा. डा. खरात हे कांदबरीकार, कवी, समीक्षक, वक्ते म्हणून सुपरिचित आहेत.

कार्यकारिणीचे अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे. उपाध्यक्ष - प्रिया धारूरकर, गिरीष जोशी, मंत्री - प्रा. संजय संभाळकर, कोषाध्यक्ष - दीपाली कुलकर्णी, कार्यालय मंत्री - विनायक पवार, युवा विभाग - प्रा. डा. मनोहर बन्सल, लोकसाहित्य विभाग - शेषराव पठाडे, बाल साहित्य विभाग - सारिका कुलकर्णी, प्रचार, प्रसिद्धी, सोशल मीडिया - मधूकर कांबळे, महिला विभाग - प्रा. तृप्ती रोंघे, सदस्य - डॉ. निलेश देगावकर, डॉ. संतोष देशमुख.

प्रांताध्यक्ष प्रा. डा. सर्जेराव जिगे व अन्य पदाधिका-यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन केले आहे.

### साहित्य भारती

भारतीय साहित्य आणि संस्कृतीतील आदर्श मूल्यांची रुजवणूक करून राष्ट्राचे पुनर्निर्माण करण्याच्या भूमिकेतून अखिल भारतीय साहित्य परिषदेची स्थापना दि. २७ ऑक्टोबर १९६६ रोजी दिल्ली येथे झाली. चोवीस भारतीय भाषेमध्ये समांतरपणे कार्यरत असणारे हे देशातील एकमेव साहित्य संघटन आहे. देशातील राष्ट्रीय विचारांचे साहित्यिक, समीक्षक, संशोधक, विचारवंत आणि साहित्य रसिकांचे राष्ट्रव्यापी संघटन म्हणजे अखिल भारतीय साहित्य परिषद होय.

भारतात वेगवेगळ्या भाषेतील विविध साहित्य संस्था खूप छान कार्य करतात मात्र त्यांच्या प्रादेशिक मर्यादा आहेत. अखिल भारतीय साहित्य परिषद मात्र सर्वच भारतीय भाषांच्या उत्कर्षाचा सर्वंकष विचार करणारी संस्था आहे. म्हणून स्थानिक पातळीवर साहित्य सेवा करणाऱ्या विविध संस्थांना आपल्यात सामावून घेत ही संस्था आजपर्यंत वाटचाल करीत आली आहे. अखिल भारतीय साहित्य परिषदेच्या कामाचा विविध अंगाने विस्तार करण्याच्या भूमिकेतून येथे साहित्य भारती या नावाने अखिल भारतीय साहित्य परिषद कार्य करत आहे.

साहित्य भारतीचा मुख्य उद्देश हा भारतीय संस्कृतीवर आधारित साहित्य, कला, विचार आणि भाषा यांचा प्रसार करणे असा आहे.

संस्थेचे मुख्य कार्य हे विविध ठिकाणी कवीसंमेलन, साहित्यसंमेलने, व्याख्याने, चर्चासत्रे घेणे. साहित्यातील विविध विषयावरील पुस्तकांचे प्रकाशन करणे, वाचन चळवळ सुरु करणे, नवलेखकांना प्रोत्साहन देणे, पुरस्कार व सन्मान देणे असे आहे. साहित्य भारती तर्फे देशभर विविध राज्य/जिल्हा शाखांमार्फत साहित्यिक उपक्रम राबवले जातात.

# सध्याच्या विद्यार्थ्यांचे गुणपत्रक आणि बुद्धिमत्तेचे वास्तव

ज्योतिर्मय साहित्य

हल्लीचे दहावीचे निकाल पाहिले की हसावं की रडावं, हेच कळेनासं होतं. चाळीस-पन्नास टक्के मिळवणारा विद्यार्थी आता शोधूनही सापडत नाही. उलट काही विद्यार्थ्यांना चक्क १००% गुण मिळत आहेत. हे पाहून प्रश्न पडतो आजची मुलं एवढी बुद्धिमान झाली आहेत, की गुण देताना खूपच उदारमतवाद दाखवला जातो आहे? कारण शंभर टक्के गुण म्हणजे पेपरमध्ये एकही चूक नाही. आणि खरंच असं होऊ शकतं का? हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. आमच्या काळात मराठीच्या पेपरमध्ये काना-मात्रा चुकली, वेलांटी राहिली किंवा पूर्णविराम विसरला, तरी अर्धा मार्क गायब व्हायचा. गणितात उत्तर बरोबर असूनही मधली पायरी चुकली, तर मार्क कमी व्हायचे. इंग्रजीत स्पेलिंग चुकलं की संपलंच समजा! विज्ञानात आकृती थोडी जरी विस्कटली, तरी गुण कमी व्हायचे.



आणि आता? ९८, ९९, १०० टक्क्यांची अक्षरशः बरसात होत आहे. एवढे गुण पाहिले की वाटतं, महाराष्ट्रात सर्वत्र ज्ञानेश्वर, आइनस्टाईन आणि विश्वेश्वरय्यांचा वारसा घेऊन मुलं जन्माला येत आहेत की काय!

पूर्वी निकालाच्या दिवशी वातावरण वेगळंच असायचं. एखाद्याला ३५% मिळाले, तरी घरात पेढे वाटले जायचे. कारण त्या काळी ''पास'' होणं हीच मोठी गोष्ट होती. गावात एखादा मुलगा फर्स्ट क्लासमध्ये पास झाला, की चहाच्या टपरीपासून किराणा दुकानापर्यंत त्याची चर्चा असायची. ७०% मिळवणारा म्हणजे अक्षरशः विद्वान समजला जायचा.

आता मात्र ९०% मिळाले, तरी विद्यार्थी आणि पालक दोघेही नाराज दिसतात. ''फक्त ९२% आले'' हे वाक्य इतक्या दुःखी सुरात बोललं जातं, की ऐकणाऱ्याला वाटावं आयुष्यच संपलं!





पूर्वी वर्गात एखादाच विद्यार्थी हुशार असायचा; बाकीचे त्याच्याकडून गृहपाठ उतरवायचे. आता प्रत्येक गल्लीमध्ये दहा टॉपर आहेत. त्यामुळे ''हुशार'' या शब्दाची किंमतच उरलेली नाही. गुण वाढले, पण गुणवत्ता कुठे हरवली हेच कळेनासं झालं आहे.

विशेष म्हणजे, त्या काळात कमी गुण मिळवणारे लोकही उत्तम प्रकारे जगले, नोकऱ्या केल्या, संसार उभे केले आणि मुलांना शिकवलं. खरं तर, त्या ३५ टक्केवाल्यांनीच आजचे ९९ टक्केवाले घडवले आहेत.

आज शिक्षणाचं रूपांतर ज्ञानापेक्षा आकड्यांच्या स्पर्धेत झालं आहे. मुलांच्या डोक्यावर टक्केवारीचं एवढं दडपण आलं आहे, की त्यांचं बालपण, खेळ, छंद आणि मस्ती हरवत चालली आहे.

पूर्वी निकाल लागला, की मित्रांची टोळी विहिरीवर, मैदानावर, सिनेमाला किंवा भेळ-मिसळीच्या हॉटेलमध्ये जाऊन आनंद साजरा करायची. आता मात्र पहिला प्रश्न असतो कटऑफ किती आहे? जग बदललं, शिक्षण बदललं, स्पर्धा वाढली हे खरं आहे. पण एक गोष्ट तितकीच खरी आहे :मार्क वाढले म्हणून बुद्धी वाढतेच असं नाही, आणि मार्क कमी पडले म्हणून आयुष्य संपतं असंही नाही. कारण शेवटीगणिताच्या वहीतले आकडे आणि आयुष्याचं गणित या दोन्ही गोष्टी खूप वेगळ्या असतात. या आकड्यांच्या स्पर्धेत धावणाऱ्या आणि यश मिळवणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचं मनः पूर्वक अभिनंदन!




# जात्यावरच्या ओव्या......

काय सांगू महती
माह्या गाव दैवतांची
दुर गावचे जन येती
माथा टेकवून जाती ||६४५||

काय सांगू महती
माह्या माहेराला पेठ
सोनं, रेशमी कापड
खरेदीला आले शेठ||६४६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३०




ज्योतिर्मय साहित्य

सेवक व्हावे तर अशा व्यक्तीचे व्हावे जो आपली कधीही उपेक्षा करीत नाही. व्यवहारात चाकरी भलेही कोणाची करा. परंतु सेवक मात्र त्या भगवंताचे व्हा. कसा आहे हा भगवंत ? ज्याचा सेवक आपल्याला व्हायचे आहे ? जयाची लीला वर्णिती लोक तिन्ही... असे समर्थ म्हणतात. या ठिकाणी लीला म्हणजे चरित्र असा अर्थ घेता येतो. हा भगवंत असा आहे की त्याच्या चरित्राचे, सामर्थ्याचे, पराक्रमाचे गुणगान तिन्ही लोक करतात. स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ. या तिन्ही लोकांत त्याच्या पराक्रमाचा डंका वाजतो.




सर्वसाधारणपणे दास होणे, किंवा सेवक होणे म्हणजे कमीपणाची गोष्ट असे आपण समजतो. परमेश्वर हा असा स्वामी आहे की ज्याचा दास किंवा सेवक होण्यात सुद्धा अभिमान वाटावा, धन्यता वाटावी. एखाद्या अधिकाऱ्याचे किंवा मंत्र्याचे नोकर असलेल्या व्यक्तीला लोक केवढा मान देतात ! ( अर्थात तो तात्पुरता असतो हा भाग वेगळा )परंतु तो नोकर त्या अधिकाऱ्यापर्यंत किंवा मंत्र्यापर्यंत आपल्याला घेऊन जातो, म्हणून आपण त्याला मान देतो. मग भगवंताचा जो सेवक असेल त्याचा मान केवढा ! त्याचे वर्णनच करता येणार नाही.

एकदा का आपण त्याचे सेवक झालो की तो आपली कधीही उपेक्षा करत नाही. सेवक म्हणजे भगवंताचा भक्त ! खरा भक्त भगवंताकडून काही हवे म्हणून भक्ती करीत नाही. तर मला भगवंत हवा आहे, त्याच्याशिवाय दुसरे काही नको अशा समर्पण भावनेने त्याची भक्ती असते. भगवंतापासून जो विभक्त नाही तो भक्त ! असा सेवक, असा भक्त जो असतो, त्याची सुखदुःखे, काळजी, चिंता आपोआप कमी होत जातात. म्हणजे त्याला त्याची पर्वा नसते. भगवंत त्याची काळजी वाहतो. भगवंताच्या नामात तो रंगून गेलेला असतो. अशा या भगवंताकडे भक्ताकडे भगवंत देखील लक्ष ठेवून असतो. तो त्याची उपेक्षा करीत नाही. त्याला मोक्षमार्गाकडे घेऊन जातो. भगवंत आपल्याला सांभाळतो अशी ज्याची खात्री असते तो निर्भयपणे जीवन जगू शकतो. लोकांनी स्तुती केली किंवा निंदा केली तरी त्याला काही फरक पडत नाही. काम, क्रोध, लोभ, मोह यासारख्या विकारांपासून असा भक्त कोसो दूर असतो. आपल्या कर्तव्यात रत असताना त्याची आठवण ठेवावी. कर्तेपण आपल्याकडे न घेता राम कर्ता आहे, तोच हे करून घेतो आहे ही भावना ठेवावी.

स्वसंवाद : १) मी भगवंताचा ''सेवक'' आहे की केवळ ''अपेक्षा करणारा भक्त''?

२) माझ्या भक्तीत निरपेक्षता आहे का, की काहीतरी मिळवण्याची अपेक्षा आहे? ३) मी माझ्या चिंता खरोखरच परमेश्वरावर सोपवतो का, की फक्त शब्दांत बोलतो? **(क्रमशः)**





# || संजय उवाच... ||



@संजय काव्या पुणे 7743918559

♦ दुसरी बाजू
प्रत्येक गोष्टीला, घटनेला दोन बाजू असतात, आपण नेहमी एकच बाजू बघतो त्यामुळे आपणास गैरसमज होतात म्हणून नेहमी दोन्ही बाजूचा विचार करणे आवश्यक असते.

# कळकळीचे नामस्मरण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आम्ही सुस्थितीत असलो म्हणजे आमचे नामस्मरण अधिक होते. त्यात काही बिघाड झाला की तिकडेच सारे लक्ष वेधते. याला कारण म्हणजे आमचे स्मरण हे वरवरचे असते. श्रद्धेने नामस्मरण करणे आपल्याला कठीण जाते. परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही असा दृढ निश्चय अगर श्रद्धा असणे आवश्यक आहे. म्हणजे मग प्रकृतीत काही बिघाड झाला तरी आपले स्मरण टिकून राहील. द्रौपदीला आता आपला कोणी त्राता नाही असे वाटून जेव्हा तिने श्रीकृष्णाचा धावा केला, तेव्हा भगवान् लगेच धावून आले. असे खऱ्या कळकळीचे स्मरण आपले असायला पाहिजे. जसे लहान मूल काहीही झाले तरी आपल्या आईलाच हाक मारते, दुसरे तिसरे कोणी जाणत नाही, तसे आपले परमेश्वर-स्मरणाच्या बाबतीत झाले पाहिजे. आपली भिस्त खरोखर कोणावर आहे हे संकटकाळीच उत्तम कळते.

नामस्मरणाच्या पायऱ्या अशा सांगता येतील - पहिली, सुस्थितीतले वरवरचे स्मरण; दुसरी, परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही ही जाणीव होऊन, संकटसमयी त्याचे स्मरण; आणि तिसरी, हीच जाणीव दृढ होऊन पुढे अखंड होणारे नामस्मरण. यांपैकी वरवर स्मरण करणारा 'आम्हांला संकटेच नकोत' असे म्हणतो, तर साधुसंत 'आम्हांला संकटे येऊ देत' असे भगवंताजवळ मागतात, कारण त्यावेळेसच त्याचे खरे स्मरण होते. आपण स्वत: आहोत याची आपल्याला आज जितकी खात्री आहे, तितकी खात्री भगवंत आहे अशी झाली पाहिजे. परमात्मा सर्व ठिकाणी आहे की कल्पना केव्हा तरी आपल्याला होते खरी, पण ती कायम न राहिल्यामुळे दृढपणे आपल्या आचरणात येत नाही; आपली वृत्ती तशी झाली की ती आपल्या आचरणात येईल. भगवंत हा कर्ता आहे अशी आपली दृढ भावना झाली की आपण प्रत्येक गोष्ट त्याला सांगत बसणार नाही, 'भगवंताला माझे सर्व कळते' असे जर खरेच वाटले तर त्याला आवडेल असेच आपण वागू. पहाटे उठावे आणि भगवंताची मूर्ती डोळ्यांसमोर आणून प्रार्थना करावी, आणि ''तुझे विस्मरण जिथे होते, तिथे मला जागृत करीत जावे; नाही मला आता तुझ्याशिवाय आसरा,'' असे म्हणून त्याला मन:पूर्वक नमस्कार करावा. मनुष्य कसाही असला तरी भगवंताच्या स्मरणात त्याला समाधान खात्रीने मिळेल. जो भगवंताचा झाला त्याला जगण्याचा कंटाळा कधीच येणार नाही. विषयाचा आनंद हा दारूसारखा आहे; ती धुंदी उतरल्यावर मनुष्य जास्त दु:खी बनतो. 'मी भगवंताचा आहे' या भावनेने जो राहील त्यालाच खरा आनंद भोगता येईल.

भोग व दुःख यांत वेळ न घालविता भगवंताकडे लक्ष दिले पाहिजे.

***


# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

♦ पाप, पुण्य टाळता येते का?

कालच्या अंकावरून पुढे....
आता अध्यात्मात येणारे कर्माचे प्रकार जसे अकर्म, विकर्म आणि निषिद्ध कर्म याचा आपण नेमका अर्थ ओळखायचा प्रयत्न करु.
शब्दांचा अर्थ यासाठी ओळखायचा की यातली कोणती कर्मे टाळावीत. कोणत्या कर्मात काय युक्ती वापरून त्याचा परिणाम कमी करता येतो हे कळेल.
कर्मा वरी कर्म विशेष वाढे/ विकर्म त्यात म्हणणे पडे/जेथ कर्म रिघो न शके पुढे/ अकर्म चोखडे या नाव// नाथ भागवत
जेव्हा एका कर्मातून दुसरे कर्म, दुसऱ्यातून तिसरे, अशी जी कर्माची वाढ होते, तिलाच "विकर्म" म्हणतात पण जेथे कर्माची वाढ खुंटते त्याला "अकर्म" हे यथार्थ नाव आहे.
जे कर्मा वेगळे सर्वांगे/ जेथ कर्म लावता ही न लगे/ जे नव्हे कर्मठा जेणे/ ते जाण सवेगे अकर्म
जे सर्वोपरी कर्माहून वेगळे.ज्याला कर्म लावू गेले तरीसुद्धा लागत नाही. जे कर्मठा जोगे नव्हे. तेच खरोखर "अकर्म" होय.
विकर्म किती संकटात टाकणारे आहे यासाठी नाथ माऊली सांगतात.
विधी निषेध जोड पाडे /जेथ विशेष कर्म वाढे/ विकर्म त्यात म्हणणे घडे/ थोर साकडे पै याचे.
विधी निषेधाची पर्वा न करता जेथे विशेष कर्म वाढते, त्याला विकर्म असे म्हणतात. हे मोठे संकटात घालणारे आहे.
क्रमश:......

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

♦ फरक सुख आणि आनंदाचा

सुख दुःखा, चांगले वाईट, कडू गोड, यशापयश, खरखोट,भलं बुरे या जोड्यामधे जसा फरक आहे तसा फरक सुख व आनंद यात आहे! तुम्हाला वाटेल सुख व आनंद सारखे अनुभवता येतात, मग फरक कसा. मी सांगतो, रोजच्या कामातून मिळतो तो आनंद. समजा घरात स्वयंपाक सडा सारवन करणं हे एखाद्या महिलेच रोजच काम. वैताग
न करता हे काम करणे म्हणजे आनंद! आनंद मिळविण्यासाठी कुठल्याच गोष्टीची गरज नसते. पण जिथं सुख येते तिथे गरज असते. समजल का?मन लावून करणे म्हणजे आनंद..अजून पहा..
हरणाला कस्तुरी त्याच्याजवळ आहे हे माहीत
नसतं ते त्याच्या शोधात ईकडे तिकडे धावत, म्हणून आपणही आनंद रोज जगण्यात आहे हे समजावे. आनंद व सुख समजंन घेणे व अनुभवणयात आपण गफलत करतो असे वाटते.
अर्थात हा ज्याचा त्याचा वैयक्तिक अनुभव आहे.आपण सुखात फक्त आपलाच विचार करतो व आनंदात इतरांना सामिल करतो.सुख संपते पण आनंद कधिच नाही संपत.जसे जामून आपण 2/3 खातो हे सुख पुर्तते नंतर ते संपते पण आनंद संपतो का? नाही. म्हणून वर्तमानात आनंद गमावू नका. काळजी घ्या. आज पुरे शुभ दिवस आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



# आरोग्य संजीवनी

## कोथिंबीर, कांदा, लसूण यांचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

३. हाय ब्लड प्रेशर नियंत्रणात - जर एखाद्याला उच्च रक्तदाबाची समस्या असेल तर त्याने कच्चा कांदा खाल्ला पाहिजे. हृदयाशी संबंधित आजारांमध्येही कांद्याचे सेवन फायदेशीर ठरते. यामुळे हार्ट अटॅकचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होतो.

४. लोहाची कमतरता भरून निघेल - कांद्याला लोह, फोलेट आणि पोटॅशियमचा उत्कृष्ट स्रोत मानला जातो. कांदा खाल्ल्याने शरीरातील लोहाची कमतरता दूर केली जाऊ शकते. कांद्यामध्ये अँटी एलर्जिक, अँटी ऑक्सिडेंट सारखे गुण असतात, जे शरीराचे अनेक प्रकारच्या इंफेक्शपासून संरक्षण करण्यास मदत करते.

लसूण :

१. डांग्या खोकला, रक्त दोष, घटसर्प, बहिरेपणा, कुष्ठरोग, संधिवात, मुळव्याध, यकृताचे आणि पित्ताशयाचे विकार यावर लसूण गुणकारी आहे. कामोत्तेजना कमी झालेल्यांनाही लसणाचा उपयोग होतो. श्वास मोकळा होण्यासाठी एक लसूण पाकळी गरम करून किंचित मीठ लाऊन खावी. दमा कमी होण्यासाठी एक पेला गरम पाण्यात दोन चमचे मध आणि १० थेंब लसूण रस घ्यावा. झोपण्यापूर्वी ३ लसूण पाकळ्या दुधात उकळून घेतल्याने दमा रात्री त्रास देत नाही.

२. न्यूमोनिया नाहीसा होण्यासाठी एक लिटर पाण्यात एक ग्रॅम लसूण आणि २५० मि.ली. दूध घालून उकळवावे. पाव हिस्सा करावे. हे दूध दिवसातून तीन वेळा घ्यावे. क्षयरोगासाठी लसूण दुधात उकळून घ्यावे, असे आयुर्वेदात सांगितले आहे. लसूण पौष्टिक, वीर्यवर्धक, उष्ण, पाचक, मलनिस्सारक आहे. मुरुमे आणि मोड्या (पिंपल्स) कमी होण्यासाठी लसूण नियमित चेहऱ्यावर चोळावा. नायटा, इसब झालेल्या त्वचेवर लसूण चोळल्याने रोग बरा होतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

३. रक्तवाहिन्यांवरील दाब, ताण कमी होतो. नाडीचे आणि हृदयाचे ठोके कमी पडतात. लसणाचे सहा थेंब चार चमचे पाण्यातून दोन वेळा घेतल्याने उच्च रक्तदाब नियंत्रित राहतो. वाढलेला रक्त दाब कमी होण्यासाठी लसूण, पुदिना, जिरे, धने, काळी मिरी आणि सैंधव मिठाच्या चटणीचे सेवन करावे.

४. लसणाच्या नियमित वापराने रक्तवाहिन्यांतील साचलेले कोलॅस्टेरोल निघून जाते. रक्तवाहिन्या कडक व कठीण होत नसल्याने हृदयाचा झटका येण्याची संभावना कमी होते. हृदयाचा झटका आल्याबरोबर पाच सहा कच्च्या लसूण पाकळ्या चावून खाल्ल्याने हार्ट फेलचा धोका टळतो.

५. आहारात लसणाचा सातत्याने वापर केल्यास कर्करोगाची शक्यता कमी होते. कारण लसूण कर्करोगाच्या पेशींना वाढू देत नाही. कर्करोगामध्ये नियमित लसणाचे सेवन करत राहिल्याने पांढऱ्या पेशींची वाढ होऊन कर्करोगाच्या पेशींची वाढ ३९ टक्क्यांनी कमी होते.

***

# प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

## नेत्र

अनमोल असे नेत्र
चेहऱ्याची खरी शोभा
बोलके सुंदर,छान
अबोल मनीचे भाव
सांगती ते दुसऱ्याला
नितळ पाण्याचा मान

नेत्रदान करावे खरे
सर्वांनी घ्यावा वसा
पुण्य हे महान
मरणोत्तरही आपण जगू
आहे खरे सत्य
अंधाला देऊ वरदान

# छत्रपती संभाजी महाराजांचा लोक कल्याणकारी दृष्टिकोन स्फूर्तीदायक-डॉ. वि.ल धारूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजी नगर : छत्रपती संभाजी महाराजांचा लोककल्याणकारी दृष्टिकोन हा स्फूर्तीदायक असून त्यांच्या जीवनकार्यातून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्याचे मूल्य जतन केले पाहिजे असे विचार प्रसिद्ध इतिहास संशोधक आणि माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांनी व्यक्त केले.

ते विवेकानंद विचार मंच आणि शालिवाहन संशोधन मंडळ यांच्या वतीने आयोजित श्री शरद डबीर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त म्हणजे अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते

सिडको येथील विवेकानंद उद्यानात हा कार्यक्रम संपन्न झाला.

प्रारंभी श्री विजय जोग संचालक विवेकानंद विचार मंच यांनी सर्वांचे स्वागत केले याप्रसंगी त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त सर्वश्री डॉ. गणेश महाजन श्री जयकुमार भोयरेकर तसेच शिवश्री शिवशंकर मुंडे यांनी त्यांचे शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन



सत्कार केला.

श्री शरद डबीर हे बँक ऑफ महाराष्ट्र चे माजी प्रादेशिक संचालक व व्यवस्थापक होते त्यामुळे बँक ऑफ महाराष्ट्रच्या निवृत्त अधिकारी संघटनेतर्फे सुद्धा त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्रचे माजी अधिकाऱ्यां तर्फेही त्यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात श्री डबीर यांच्या कार्याची गौरवपूर्ण माहिती देऊन डॉ. धारूरकर पुढे म्हणाले की श्री डबिर हे त्यांच्या महाविद्यालयीन जीवनाच्या काळात संभाजीनगर येथील अजिंठा दैनिकांमध्ये कार्य करत होते त्यांच्या या अनुभवाचा फायदा त्यांना पुढे बँकेच्या प्रशासकीय कार्यातही झाला.

श्री साखरे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून याप्रसंगी संभाजी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

राष्ट्रकूट प्रभात शाखेचे श्री भोयरेकर तसेच श्री साखरे श्री विजय शिरसे यांनीही श्री डबीर यांचा सत्कार केला.

डबीर यांच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे झाली याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना श्री डबीर म्हणाले की शालिवाहन संशोधन मंडळ आणि विवेकानंद विचार मंच यांच्या वतीने अमृत महोत्सवी सत्कार करण्यात आला हा एक दुग्ध शर्करा योग आहे. मी दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा विशेष आभारी आहे.

या कार्यक्रमाच्या सांगता समारंभात श्री शिवशंकर मुंडे यांनी सर्वांचे आभार मानले याप्रसंगी सिडको एन थ्री एन फोर मधील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमोद बेंडे, अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक संस्था गीता भवन माजी सेक्रेटरी श्री तुल्ले साहेब व बुरांडे तसेच शिरसे बक्षी मस्के डॉक्टर सपकाळ डॉक्टर मुळे रिटायर जज श्री कुलकर्णी साहेब तुपे साहेब हे उपस्थित होते. कार्यक्रम पार पाडण्यासाठी श्री विजय जोग गणेश महाजन व इतर लोकांनी सहकार्य केले श्री शिवशंकर मुंडे यांनी आभार प्रदर्शन केले या सर्वांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी श्री संतोष मिमरोट यांनी कार्यक्रमाचे संचालन केले आणि पाहुण्यांची ओळख करून दिली. शेवटी अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



## थक्क होण्यातील विस्मय आणि जिज्ञासा


**ज्योतिर्मय साहित्य**

समर्थ रामदास स्वामींच्या मनाचे श्लोक या मालिकेतील ३८ व्या श्लोकावरील हे विवेचन अत्यंत मार्मिक आणि डोळस आहे. हे विचार मनाला अंतर्मुख करणारे आहेत.

थक्क होण्यातील विस्मय आणि जिज्ञासा छान विषद केली आहे.

आपण अनेकदा ईश्वराकडे किंवा सृष्टीकडे मागणी करण्याच्या भावनेने पाहतो. पण तुम्ही रेल्वे इंजिनाचे जे उदाहरण दिले, ते अतिशय चपखल आहे. विज्ञानात ज्याला ''सेन्स ऑफ वंडर'' म्हणतात, तोच इथे अध्यात्मात विस्मय म्हणून आला आहे. जेव्हा मन थक्क होते, तेव्हाच अहंकाराचा पडदा सरकतो आणि खऱ्या अर्थाने जाणून घेण्याची प्रक्रिया सुरू होते.

वस्ती करणे म्हणजे काय? तर केवळ मंदिरात जाणे म्हणजे वस्ती करणे नव्हे, तर बुद्धी आणि चित्त अखंडपणे त्या तत्त्वाशी जोडून ठेवणे, हे राघवी वस्ती कीजे यातून छान स्पष्ट केले आहे. सृष्टीचा कार्यकारण भाव समजून घेण्यासाठी त्या निर्मात्याच्या सानिध्यात राहणे ही संकल्पना तांत्रिक युगातही किती समर्पक आहे, हे लेखनातून जाणवते.



विभावरी कुलकर्णी
पुणे मो. ८०८७८१०१९७

अवज्ञा टाळण्याचा इशारा दिला आहे. समर्थ जेव्हा प्रार्थना करतात, तेव्हा त्यात एक प्रकारची करुणा असते. ''अवज्ञा कदाही येदर्थी न कीजे'' या ओळीचा अर्थ तुम्ही हिताचे सांगणे असा लावला आहे, हे महत्त्वाचे आहे. आई जशी मुलाला हिताची गोष्ट सांगताना कळकळीची विनंती करते, तशीच ही प्रार्थना आहे.

रेल्वे इंजिन आणि सृष्टीतील वैविध्य या उदाहरणांमुळे गहन आध्यात्मिक विषय सर्वसामान्यांना समजेल असा सोपा झाला आहे.

विवेचनाची भाषा ओघवती आणि सकारात्मक आहे.

स्वसंवादातील दिलेले तीन प्रश्न केवळ वाचून सोडून देण्यापेक्षा, स्वतःच्या मनात डोकावून पाहण्यास भाग पाडतात. विशेषतः ''सर्व काही गृहीत धरून जगतो आहे का?'' हा प्रश्न आजच्या धावपळीच्या युगात खूप महत्त्वाचा आहे.

हे विवेचन भक्ती आणि ज्ञान यांचा सुंदर संगम आहे. समर्थांच्या शब्दांतील अधिकार आणि विनंती या दोन्ही छटा तुम्ही प्रभावीपणे टिपल्या आहेत. पुढील भागांची प्रतीक्षा! जय जय रघुवीर समर्थ!



## रुग्णवाहिका सेवेच्या गुणवत्ता मानकांसाठी मूल्यांकनकर्ता प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – भारत सरकारच्या आरोग्य क्षेत्र कौशल्य परिषद आणि 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड' यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्णवाहिका सेवा मानांकन निकषांनुसार देशातील पहिलाच ''मूल्यांकनकर्ता प्रशिक्षण कार्यक्रम'' पुण्यात यशस्वीरित्या संपन्न झाला. १३ ते १५ मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण उपक्रमात देशभरातील तज्ज्ञ, प्रशिक्षक आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा क्षेत्रातील प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

देशभरातील रुग्णवाहिका सेवांची गुणवत्ता अधिक सक्षम, परिणामकारक आणि रुग्णकेंद्री करण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून प्रशिक्षित आणि प्रमाणित मूल्यांकनकर्त्यांची फळी तयार करण्यात आली असून, हे मूल्यांकनकर्ते देशातील विविध रुग्णवाहिका सेवांचे परीक्षण करून उच्च दर्जाची सेवा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे मुख्य अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. प्रसाद राजहंस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपत्कालीन आरोग्य सेवांमध्ये गुणवत्ता, रुग्ण सुरक्षितता आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचे महत्त्व अधोरेखित करत अशा संरचित प्रशिक्षण कार्यक्रमांची गरज स्पष्ट केली. प्रशिक्षित मूल्यांकनकर्त्यांमुळे रुग्णवाहिका सेवांचा दर्जा अधिक उंचावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


यावेळी भारत सरकारच्या हेल्थ सेक्टर स्किल कौन्सिल रुग्णवाहिका सेवा प्रदाता मानांकन निकष समितीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपत्कालीन वैद्यकीय सेवांमध्ये व्यवहार्य, संवेदनशील आणि परिस्थितीनुरूप मूल्यांकन प्रणालीची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. गुणवत्ता हमी, सातत्यपूर्ण सुधारणा आणि कार्यक्षम प्रतिसाद व्यवस्थेसाठी प्रशिक्षित मूल्यांकनकर्ते अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

तीन दिवसांच्या सत्रांमध्ये रुग्णालयपूर्व आरोग्य सेवांमधील मानकीकरण, कौशल्य विकास, गुणवत्ता सुधारणा, मूल्यांकन प्रक्रिया आणि क्षमता वृद्धी या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. देशातील रुग्णवाहिका आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्थेमध्ये गुणवत्ता हमी यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

आरोग्य क्षेत्रातील कौशल्य विकास, मानकीकरण आणि गुणवत्ता हमी अधिक सक्षम करण्यासाठी 'बीव्हीजी' सातत्याने कार्यरत असून, भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे देशातील आपत्कालीन आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला.

## विविध भावभावनांची हिरकणी

**ज्योतिर्मय साहित्य**




सरोजिनी भनक यांचा हिरकणी हा काव्यसंग्रह दारव्हा येथे संपन्न झालेल्या शिक्षक साहित्य संघाने आयोजित केलेल्या दिमाखदार काव्य संमेलन प्रसंगी प्रसिद्ध लोक कलावंत, कवी मामा मरगडे, प्रसिद्ध कवी, स्तंभलेखक कवी सोनखासकर सर व गुलाब सोनोने यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. हिरकणी मध्ये एकूण १०० कविता असून विषयांच्या विविधतेने नटलेला आहे. सरोजिनी भनक यांचा हा पहीला वहीला काव्यसंग्रह असला तरी भावभावना इष्ट शब्दात पकडण्याची प्रतिभा त्यांच्याकडे आहे, त्यामुळे त्या कविता भावछटा, शब्दमाधुर्य गुणांनी ओतप्रोत भरलेल्या आहेत.

कवयित्री भनक यांनी हा काव्यसंग्रह आपल्या तिर्थरूप आई –बाबाना सादर समर्पित केला आहे. हिरकणीत निसर्ग, भक्ती, महामानव व्यक्तिचित्रण, प्रेमविषयक, अध्यात्म, वात्सल्य भाव, स्त्री मनाच्या भावभावनांचे तरंग दिसून येतात. साई माऊली या कवितेत त्या म्हणतात नष्टवी जगग्जिवना / दयाळा मायबापा / शिर्डीकर जगदिशा / कामक्रोधाशी जिंकाया /

तसेच वि दा सावरकर, लोकमान्य टिळक, सावतामाळी, अण्णा भाऊ साठे, डॉ अब्दुल कलाम, महाराणा प्रताप, संत गाडगे बाबा, डॉ सरोजिनी बाबर यांच्या कार्यकर्तृत्वावर कविता आहेत. शेतकरी हा पोशिंदा आहे त्याची परवड चालू आहे. शेतकरी राजा या कवितेत त्या म्हणतात– शेतकरी बळी राजा, पोशिंदा तुच जगाचा, मातीमध्ये गाडून पैसे, ध्यास सोने उगण्याचा त्यांच्या कवितेत नुसत्या कल्पनांची भरारीच नसून सामाजिक वास्तवाचे भान सुद्धा आहे. बालपणीच्या आठवणीत त्या आजही रमतात – आम्ही दोघे, तुझ्या संगे, माझे बाबा, रम्य बालपण या कवितांतून त्यांच बालपण मांडतात. निसर्ग कवितांची रेलचेल आहे उदा – हवा ही गुलाबी, अबोली, अंगणात फुलांचा सडा, माझी माती माझं आकाश, प्राजक्ताची फुले, श्रावण चाहूल, डेरेदार वृक्ष , पाऊसधारा , कोजागिरी पोर्णीमा, मेघमाला, फुलांशी संवाद आदी कवितातून त्यांचे निसर्ग प्रेम वाचकांच्या प्रत्ययास येतेत. तसेच भेट, आठवण, लावण्यवती , समजून घे ना जरा, तुला पाहते रे, प्रथम तुज पाहता, गुंतता हृदय हे, या प्रेमविषय क कविताअसून नात्यांची घट्ट विण जाणवते . हिरकणी या कवितेत त्या म्हणतात – –

स्त्रीत्वाचा सन्मान हिरकणी,
नारी शक्तीचं सामर्थ्य हिरकणी,
मातृहदयाची साद हिरकणी,
अजिंक्याची उर्जा हिरकणी



प्रा. रमेश वाघमारे, पुसद
जि यवतमाळ ,
मो . ९४२३१३३२५९

काव्यसंग्रहास वैशाली हिरे, मंगला गुल्हाणे, यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. मलपृष्ठावर लातूरचे कवी लेखक प्रा डॉ सुशिल सातपुते यांनी अनिष्ठ स्त्री परंपरेचे बंधने झुगारून नवे आचार विचार पेरणारा हिरकणी काव्यसंग्रह आहे.

या शब्दात पाठराखण केली आहे. प्रस्तुत काव्यसंग्रह साई प्रकाशन चंद्रपूर व प्रकाशिका वैशाली चांदेकर मून तर मांडणी रजनी अनिता साधुजी चांदेकर यांची आहे. मुखपृष्ठ खरोखरच अतिशय समर्पक, आशयगर्भ अन् वाचकाशी गुज करणारं आहे. कवयित्री सरोजिनी भनक यांचा हिरकणी काव्य बहर आहे. पुढे ही त्यांच्या काव्य फुलोरा फुलत राहों या पेक्षा ही अधिक समृद्ध काव्य प्रसूत होवो. त्याच्यापुढील लेखन प्रवासास माझ्या अनंत हार्दिक शुभेच्छा!

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



# ॥ अधिक मास ॥

संकलन
मधुकर बोरीकर
9403061886

आपले सण आपले उत्सव

या महिन्यात रोज पहाटे लवकर उठून थंड पाण्याने स्नान करावे.
अंगाला सुगंधी उटी लावा, नदीवर अथवा तीर्थाच्या ठिकाणी स्नानादी धार्मिक कृती करावी. मन निर्मळ ठेवावे. या महिन्यात आवळीच्या झाडाखाली स्नानाला विशेष महत्त्व आहे.

■ स्नानानंतर म्हणायचा मंत्र
गोवर्धनाधरं वंदे गोपालं गोपरुपिणम्/
गोकुलोत्सवमीशानं गोविंदं गोपिका प्रियम्//
भक्तिर्भवती गोविंदे पुत्र पौत्र विवर्धिनी/
अकिर्तीक्षयमाप्नोती सत्कीर्तिर्वर्धते चिरम्//

या महिन्यात शक्यतो एकाच वेळेस अन्नग्रहण करावे. जेवताना मौन पाळावे.
अधिक महिन्यात रोज देवाजवळ दिवा लावावा, आणि महिन्याच्या शेवटी तो ब्राह्मणाला दान द्यावा
या महिन्यात आपल्याला आवडणाऱ्या वस्तूचा त्याग करावा. (उदाहरणार्थ एखादे फळ अथवा एखाद्या रंगाचे वस्त्र वगैरे)
या महिन्यात दानाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.
हिंदू धर्मात मुलगी जावयाला लक्ष्मी नारायणाचा जोडा म्हणतात. म्हणून जावयाला तुपात तळलेले 33 च्या पटीत अनारसे देतात. एका चांदीच्या अथवा तांब्याच्या ताम्हनात अनारसे ठेवून त्यावर तांब्याचा दिवा ठेवून तो लावून जावयाला देतात. (अनारसे ऐवजी बत्तासे मैसूर पाक किंवा जाळीदार पदार्थ द्यावयाचे असतात)
या महिन्यात नारळ सुपाऱ्या, फळे यासारख्या वस्तू सुद्धा 33 च्या पटीत देऊन दान करतात.
(या महिन्यात पुरणाचे दिंड करून ईस्ट मित्रांना नातेवाईकांना भोजन देतात. या दिंड्यांना धोंडे सुद्धा म्हणतात. यावरून या महिन्यात धोंडे महिना सुद्धा म्हणतात)
रोज गाईला पुरणपोळीचा घास द्यावा.
महिनाभर सतत नामस्मरण करावे. यात कुल दैवताचे नामस्मरण सर्वश्रेष्ठ असते.
नारायण श्रीकृष्णाचे स्मरण करावे.

■ उप दानाचा संकल्प
विष्णोः प्रसादसिद्ध्यर्थं,
मम सकुटुम्बस्य आयुरारोग्यऐश्वर्याभिवृद्ध्यर्थं,
समस्तपापक्षयद्वारा पुण्यप्राप्त्यर्थं च,
अस्मिन् अधिकमासे अपूपदानं करिष्ये।
दान देताना असे म्हणतात –
इदं अपूपदानं श्रीमन्नारायणाय समर्पयामि।
याप्रमाणे संकल्प करून दान वस्तूची पूजन करावे नंतर ब्राह्मणाचे पूजन करून पुढील श्लोक आणि त्यांची प्रार्थना करावी. क्रमशः......



# उत्तराखंडमधील एक निसर्गरम्य प्रवास

(भाग एक)

विश्वास देशपांडे,
चाळीसगाव. 94037 49932

मागील अंकावरून पुढे.....
आमच्याजवळ असलेल्या कंपनीच्या ठराविक हॅन्डबॅग आणि कॅप यांच्या साहाय्याने विमानतळावरच आम्ही आमच्यासोबत सहलीला येणाऱ्या सहप्रवाशांना ओळखले. बरोबर पावणेसातच्या सुमारास आम्हाला विमानात प्रवेश देण्यात आला. आणि ठरलेल्या वेळेला म्हणजे सकाळी साडेसातला विमानाने हवेत झेप घेतली. ९.४५ ला आम्ही दिल्ली विमानतळावर होतो. तिथून सामान घेऊन बाहेर पडल्यानंतर आम्हा सर्वांना एका ठिकाणी थांबण्यास सांगितले होते. आमचा टूर मॅनेजर अक्षय गुप्ता बाहेर आमच्या स्वागतासाठी उभाच होता. त्याने आपल्या सहज संवाद साधण्याच्या पद्धतीने थोड्याच वेळात आम्हा सगळ्यांना आपलेसे केले.
थोड्याच वेळात गिरिकंदची बस आली. आम्ही सगळे बसमध्ये बसलो आणि आमचा दिल्ली ते भीमताल असा प्रवास सुरु झाला. हा प्रवास साधारणपणे ७ ते ८ तासांचा आहे. दिल्ली ते भीमताल हे अंतर ३११ किमी आहे. आमची बस दिल्लीतील प्रमुख रस्त्यांवरून धावत होती. अकबर रोड, इंडिया गेट, दिल्लीतील vip लोकांचे बंगले आमच्या दृष्टीस पडत होते. आमचा टूर मॅनेजर अक्षय आम्हाला अधूनमधून त्याबद्दल माहिती देत होता. एकदा मध्ये थांबून चहा नाश्ता झाला. परत एकदा जेवणासाठी बस एका ठिकाणी थांबली. त्याठिकाणी उत्तम गरमागरम जेवणाचा आनंद सर्वांनी घेतला. उत्तर प्रदेश मधून उत्तराखंडकडे बस धावत होती. आम्ही जाणार होतो तो सगळा भाग कुमाऊं रिजनमध्ये येतो. हा सगळा भाग हिमालयाच्या पर्वतराजीने समृद्ध आणि नटलेला आहे. दिल्लीतून बाहेर पडताना मोठमोठे फ्लायओव्हर्स, अनेक पदरी रस्ते होते. त्यामुळे बस भराभर पुढे वाटचाल करीत होती. एकामागून एक गावे मागे पडत होती. उष्ण प्रदेश मागे टाकून आमची वाटचाल थंड प्रदेशाकडे होत होती. लवकरच हिमालयाच्या पर्वतराजीमध्ये बसने प्रवेश केला. मोठे भव्य रस्ते आता मागे पडून पहाडातील अरुंद रस्ते दृष्टीस पडत होते. साहजिकच बसचा वेगही कमी झाला होता. क्रमशः........



# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495

## रेवती आणि बलराम यांचा विवाह

कालच्या अंकावरून पुढे.....
यानंतर वैदिक पद्धतीने त्यांचा विवाह संपन्न झाला.
देवतांनी पुष्पवृष्टी केली आणि सर्वत्र मंगलध्वनी घुमू लागली.

■ कथेमागील गूढ आध्यात्मिक अर्थ
ही कथा केवळ विवाहकथा नाही. तिच्यात अनेक गहन संदेश दडलेले आहेत.
१. काळ सर्वात शक्तिशाली आहे
काळासमोर राजा, राज्य, संपत्ती आणि वैभव सर्व बदलून जाते.
राजा ककुद्मींसाठी जे वर्तमान होते, ते काही क्षणांत इतिहास झाले.
२. ब्रह्मांडात काळाची गती वेगवेगळी असते
ही कथा सांगते की विविध लोकांमध्ये काळ वेगवेगळ्या प्रकारे वाहतो.
पृथ्वीवरील काही क्षण ब्रह्मलोकात अत्यल्प असू शकतात.
आजच्या विज्ञानातील "टाइम डाइलेशन" या संकल्पनेशीही याची तुलना केली जाते.
३. ईश्वराची योजना सर्वोत्तम असते
राजा स्वतःच्या बुद्धीने योग्य वर शोधत होते, पण शेवटी ईश्वराची योजना सर्वोत्तम ठरली.
रेवतीचा विवाह स्वतः भगवान विष्णूंच्या अंशावतार बलरामांशी झाला.
४. अहंकार व्यर्थ आहे
मनुष्याला वाटते की तो सर्व काही नियंत्रित करू शकतो, पण काळ आणि ईश्वराची इच्छा हाच अंतिम सत्य असतो.
या कथेतून मिळणाऱ्या शिकवणी
■ योग्य वेळ आल्यावर सर्व काही आपोआप घडते
■ ईश्वर जे करतात त्यात खोल कल्याण दडलेले असते
■ काळ कोणासाठीही थांबत नाही
■ धैर्य आणि श्रद्धा ठेवणाऱ्याला शेवटी श्रेष्ठ फल मिळते
■ हे जग परिवर्तनशील आहे; फक्त ईश्वरच शाश्वत आहेत
ही कथा भारतीय पुराणांतील सर्वात अद्भुत कथांपैकी एक मानली जाते, कारण यात प्रेम, काळ, ब्रह्मांड आणि ईश्वरलीला यांचा अप्रतिम संगम दिसून येतो.

# घरची खुसखुशीत टेस्टी नानकटाई

**ज्योतिर्मय साहित्य**

नानकटाई हा बेकरीमधील सर्वांचा आवडता पदार्थ! कधी तरी ती खाण्याची इच्छा अगदी तीव्रतेने होते. पण अचानक डाएट आठवते,त्यातील मैदा आठवतो आणि मग तो मोह आवरता घ्यावा लागतो पण आता हिच नानकटाई आपण अगदी घरच्या घरी, मैद्या शिवाय आणि त्यापेक्षा टेस्टी,खुसखुशीत आणि ताजी ताजी बनवून मनसोक्त खाऊ शकतो. आणि मुख्य म्हणजे तीसुद्धा अगदी कमी कष्टात! पाहायची उत्सुकता वाढली ना आता? चला मग, वेळ कशाला फुकट घालवायचा

**साहित्य –** १ वाटी कणिक,अर्धी वाटी बेसन, पाव वाटी एकदम बारीक रवा, पाऊण वाटी तूप, पाऊण वाटी पिठीसाखर, पाव चमचा बेकिंग सोडा, १०..१२ वेलदोड्याची जाडसर पूड, सजावटी साठी थोड्या पिस्त्याचे पातळ काप किंवा चारोळी.

**कृती –** प्रथम सर्व पिठे व रवा बारीक चाळणीने चाळून घ्यावे. नंतर एका बाऊल मध्ये रूम टेम्प्रेचरचे साजूक तूप घ्यावे. ते एकाच दिशेने व्हिस्कर किंवा बीटरच्या सहाय्याने थोडेसे फेटून घ्यावे. आता त्यात सर्व पिठीसाखर घालावी. जास्त गोड हवी असेल तर अजून थोडीशी पिठीसाखर घातली तरी हरकत नाही. मग ते दोन्ही मिळून पुन्हा भरपूर फेटून घ्यावे. त्याचा रंग बदलून थोडासा पांढरा दिसायला लागला,आणि ते हलके झालेले दिसायला लागल्यावर एका छोट्याश्या वाटीत थोडे पाणी घेऊन त्यात एक थेंब हे फेटलेले मिश्रण टाकून पहावे. ते सगळे व्यवस्थित पाण्यावर तरंगले म्हणजे



ते छान तयार झाले असे समजावे. मग त्यात चाळलेले कणिक,बेसन व रवा घालून बेकिंग पावडर सोडा घालावा, वेलदोड्याची पूड घालावी व शक्यतो रबरी किंवा लाकडी उलथण्याने अतिशय हलक्या हातांनी सावकाशपणे एकत्रीत करून घ्यावे. शेवटी अतिशय हळुवारपणे त्याचा गोळा बनवावा.

आता नॉनस्टिकचे आप्पेपात्र घेऊन त्यात त्याचे छोटे छोटे बॉल्स बनवून ते किंचीत दाबून चपटे बिस्कीट बनवावे व त्यावर आकर्षक दिसण्यासाठी पिस्त्याचे पातळ काप किंवा चारोळी लावावी व ते ठेवावे.

मग हे आप्पेपात्र एका तव्यावर ठेवावे व त्यावर घट्ट झाकण ठेवावे. तवा तापेपर्यत

आधी २ मिनिटे गॅस मध्यम आचेवर ठेवावा मग अर्धातास तो एकदम मंद ठेवावा. अर्ध्यातासाने तो बंद करून झाकण उघडून नानकटाई व्यवस्थित तयार झाल्याचे दिसले की तवा थोडासा थंड झाला की नानकटाई आपोआप सुटून येते. मस्त स्वाद घरभर दरवळतो. आपली ही तयार ताजी ताजी खुसखुशीत नानकटाई खाण्यासाठी एकदम तय्यार आहे. ही सर्व्हिंग डिश मध्ये काढून खाण्यासाठी द्यावी. जास्तीची थंड झाल्यावर घट्ट झाकणाच्या डब्यात काढून ठेवावी.

**वैशिष्टये –** बाजारच्या नानकटाई पेक्षा ही नानकटाई नक्कीच हेल्दी असते शिवाय स्वतः बनवल्याचे वेगळेच समाधान मिळते. घरात असलेल्या कणिक,बेसन,रवा,तूप या साध्या पदार्थातून इतकी सुरेख आणि पौष्टिक नानकटाई बनते. मैद्यापेक्षा कणिक आरोग्यासाठी उत्तमच असते, शिवाय बेसन तर छानच असते. रव्यामुळे छान रवाळ बनते. तर वेलचीचा आणि साजूक तुपाचा स्वाद इतका लाजवाब असतो की शब्दात सांगणे कठीणच आहे.


यात चव अजून थोडी वाढावी म्हणून अगदी चिमूटभर मिठ टाकावे. किंवा वेलचीच्या ऐवजी व्हनीला इसेन्सचे ७..८ थेंब घातले तरी वेगळाच फ्लेवर येतो. नॉनस्टिकचे आप्पेपात्र नसले तर जाड बुडाच्या कढई मध्ये रिंग ठेवून त्यावर एक डिश ठेवून त्या डिशला चिकटू नये म्हणून थोडेसे तूप लावून त्यावर नानकटाई ठेवून वर घट्ट झाकण ठेवून नॉनस्टिकच्या पात्रा सारखेच अर्धातास मंद आचेवर बेक करावे व मस्त नानकटाई बनवावी.अशी खुसखुशीत, टेस्टी नानकटाई एकदा बनवाल तर पुन्हा पुन्हा नक्कीच बनवाल!












































हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# गदर विद्रोहाचे प्रमुख सुत्रधार सोहन सिंह भकना

**ज्योतिर्मय साहित्य**

सोहन सिंह भकना हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर क्रांतीकारक होते. ज्यांना बाबा सोहन सिंह म्हणून ओळखले जाते. ते गदर पार्टीचे संस्थापकापैकी एक होते. १९१५ च्या गदर विद्रोहाचे ते प्रमुख सुत्रधार होते. पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील खतरे खुरद या गावी ४ जानेवारी १८७० रोजी जन्मलेले सोहनसिंह यांनी आपले संपूर्ण आयुष्य ब्रिटिश साम्राज्याविरुध्द लढण्यासाठी समर्पित केले. त्यांचे क्रांतीकारी कार्य अमेरिकेतील गदर चळवळीपासून पंजाबच्या शेतकरी आंदोलनापर्यंत पसरलेले आहे. गदर संघटनेच्या योजनेप्रमाणे पहिल्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश शासन उलथवून टाकण्यासाठी सोहन सिंह भकना भारतात आले. १३ ऑक्टोबर १९१४ रोजी त्यांना कलकत्त्यात अटक करण्यात आली. २६ एप्रिल १९१५ पासून चालू झालेल्या लाहोर षड्यंत्र केस या खटल्यात १३ सप्टेंबर १९१५ रोजी लाहोर सेंट्रल जेलमध्ये त्यांना व इतरांना कोर्टकेस निकाल वाचून दाखविण्यात आला. सोहन सिंह भकना आणि इतर २३ जणांना फाशीची शिक्षा तर २७ जणांना आजीवन कारावास ठोठावण्यात आला. ब्रिटिश भारताचे व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग यांनी आपल्या अधिकारात २४ पैकी १७ जणांची फाशी रद्द करून त्यांना जन्मठेप- काळ्या पाण्याची शिक्षा दिली व ७ जणांची फाशीची शिक्षा कायम केली. ज्यांची फाशीची शिक्षा कायम केली त्यात उल्लेखनीय नावे म्हणजे बागी करतारसिंग, विष्णु गणेश पिंगळे, हरनामसिंग व जगतसिंग हे होत. १५ नोव्हेंबर १९१५ रोजी हा निर्णय घेऊन जन्मठेपवाल्यांना फाशीवाल्यांपासून अलग करण्यात आले. सोहन सिंह भकना यांची फाशीची शिक्षा रद्द होऊन आजीवन कारावास (जन्मठेप) ही शिक्षा देण्यात आली.



सोहन सिंह भकना यांनी आपले बालपण भाकना येथे घालवले. त्यांचे वडिलांचे नाव भाई करमसिंग जे अमृतसरच्या नैऋत्येस १६ किमी. अंतरावर असलेल्या भाकना गावात आपल्या कुटुंबासह रहात होते. सोहन सिंह भकना यांना गावातील गुरुव्दारात आणि आर्य समाजाकडून बालशिक्षण मिळाले. त्यांनी १८८६ मध्ये प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. पंजाबी, उर्दू आणि फारशी भाषेमध्ये ते पारंगत होते. वयाच्या दहाव्या वर्षीच त्यांचा विवाह बिशन कौर, यांच्याशी झाला. १९०० च्या दशकात पंजाबमध्ये उदयास आलेल्या राष्ट्रवादी चळवळीत आणि कृषिविषयक अशांततेत ते सामील झाले. १९०६-०७ मध्ये वसाहतविरोधी विधेयकाविरुद्धच्या आंदोलनामध्ये त्यांनी भाग घेतला. फेब्रुवारी १९०९ मध्ये ते अमेरिकेला नोकरीसाठी जहाजाने निघाले आणि दोन महिन्याच्या प्रवासानंतर ४ एप्रिल १९०९ रोजी सिएटलला पोहोचले. लवकरच शहराच्या जवळ बांधल्या जात असलेल्या लाकडाच्या गिरणीत मजूर म्हणून त्यांना काम मिळाले. १९००च्या पहिल्या दशकात म्हणजे १९१० पर्यंत उत्तर अमेरिकेच्या पॅसिफिक किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर भारतीय नागरीकांचे स्थलांतर झाले. स्थलांतरितांचा एक मोठा भाग विशेषतः ब्रिटिश भारतातील पंजाबमधून आला होता. जो आर्थिक मंदी आणि कृषी अशांततेचा सामना करत होता. कॅनेडियन सरकारने या भारतातून उपजीविकेसाठी येणाऱ्या नागरीकांच्या लोंढ्याला तोंड देण्यासाठी अनेक कायदे केले. या कायद्यांमुळे भारतीय समुदायांमध्ये वाढता असंतोष, निदर्शने आणि वसाहतविरोधी भावनांना खतपाणी मिळाले. वाढत्या कठीण परिस्थितीला तोंड देत समुदायाने स्वतःला राजकीय गटांमध्ये संघटित करण्यास सुरवात केली. मोठ्या संख्येने अमेरिकेतही स्थलांतरित भारतीयांना अशाच राजकीय आणि सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागले.या गटामधील सुरवातीच्या कार्याचा काळ सुमारे १९०८ सालचा होता. याच काळात लोकमान्य टिळक यांचे सहकारी जे अमेरिकेत भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी कार्य करीत होते ते डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांनी पंडित काशीराम यांचे मन वळवुन तारकानाथ दास, भाई भगवान सिंग आणि इतर पंजाबी स्थलांतरित यांना घेऊन राजकीय चळवळीच्या दिशेने काम चालू केले. या सर्वांनी मिळून ओरेगॉनमधील पोर्टलँड येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची (भारतीय स्वातंत्र्यसंघ) स्थापना केली. याच काळात सोहन सिंह भकना हे भारतीय स्थलांतरितामध्ये आकार घेत असलेल्या या राजकीय चळवळीशी घट्टपणे जोडले गेले. या संस्थेच्या शाखा लवकरच साक्रामंटो, कॅलिफोर्निया इत्यादि दिकाणी चालू होऊन पाचशेवर भारतीय स्वातंत्र्यसंघाचे कार्यकर्ते सभासद झाले. या कामाला प्रारंभी यावा तसा भर आला नसला तरी १९०९ नंतर खरा जोर आला व त्याचे कारण म्हणजे आशियातील मजुरांचे येणे थांबविण्यासाठी एशियाटिक इमिग्रेशन ॲक्ट तयार करून १९०९ साली अमेरिकन सरकारने हिंदी मजुरांच्या हृदयावर आघात केला हे होय.





१९१२ च्या अखेरीस भारतीय अमेरिकन क्रांतीकारकांना एका प्रतिभासंपन्न नेतृत्वाचा लाभ झाला. युरोपमधून लाला हरदयाळ हे पॅरिस सोडून वि.दा. सावरकरांच्या अटकेनंतर अमेरिकेत येऊन होनोलुलु येथे एकांतात तपःसाधना करीत होते. भाई परमानंद यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना धर्म व तत्वज्ञानाचा प्रसार करावयाच्या कार्यात ओढले. अमेरिकेत मूळ धरू लागलेल्या क्रांतीकार्यास येऊन लाला हरदयाळ मिळाले. गदर च्या प्रेरणेने भारलेल्या सहस्त्रावधी भारतीयांचे नेतृत्व त्यांनी स्वीकारल्यावर अस्टेरिया येथे क्रांतिकारकांचा एक प्रचंड मेळावा भरून हिंदू असोसिएशन ऑफ पॅसिफीक कोस्ट या नावाने गदर अथवा स्वातंत्र्ययुद्ध करणाऱ्यांचा पक्ष स्थापन झाला. १९१३ मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेचे नेतृत्व लाला हरदयाळ, डॉ.पांडुरंग खानखोजे आणि सोहन सिंह भकना यांनी केले. सोहन सिंह भकना याचे अध्यक्ष होते.

**(क्रमशः)**

# आजची बदललेली पिढी

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)



आईवडील चांगल्या गोष्टी शिकवायला वा सांगायला गेले की, असूदेत मला ते येतं, ते मला कळतं, मला सांगायची गरज नाही. मी करतो ते काम, त्यात काय येवढं शिकवायचं. सोपं तर आहे. ही मी पणाची, अरेरावीची, अहंपणाची भाषा मुलं सर्रास बोलताना दिसून येत आहेत. म्हणून या बदलत्या पिढीला आपणच थोडं नमतं घेऊन त्यांना समजावून सांगणे खुप अगत्याचे ठरते. मुलं उलट बोलायला लागली की त्याच क्षणी त्यांना त्या गोष्टीचे गांभीर्य समजावून सांगणे. मुलं एखादी गोष्ट ऐकतंच नसतील तर दोन फटके देऊन शांत करणे. म्हणजे मुलं परत परत ती गोष्ट आईवडिलांसमोर बोलण्याचे धाडस करणार नाहीत.




तू अजून लहान आहेस, तुला त्यातलं कांही समजत नाही, तुला ती गोष्ट समजावून सांगण्यासाठी मी आणि बाबा आहोत. त्यामुळे आमचं म्हणनं न डावलता ती गोष्ट वा ते काम त्याच पद्धतीने कर. जसं आम्ही सांगत आहोत. मुलांच्या बदलत असलेल्या सवयींकडे, मोबाईल वापराकडे, भाषेकडे, राहणीमानाकडे वेळोवेळी आपण लक्ष देत राहणे. या वेळेत घरी यायलाच हवं, या वेळेत झोपायलाच हवं, अति मोबाईल वापर नको, पॉकेट मनी म्हणून उगीच पैशाचा अपव्यय नको या गोष्टींचे जाळीदार कुंपण तयार करावे.

# जीवनमूल्ये जपणारे ‘‘धुक्यातले चांदणे’’

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

‘‘पडदा’’ या लेखामध्ये वयात आलेल्या मुलीशी आईने कसे वागावे याचे अत्यंत सुंदर विवेचन केले आहे. ‘‘आई आणि मुलगी मधला गैरसमजाचा पडदा हळुवार, आपुलकीच्या शब्दांनी अलगद दूर करायला हवा’’ हा आपला विचार निश्चितच मार्गदर्शक ठरतो.

‘‘गुलदस्त्यातल्या कळ्या’’ या लेखात आपल्या लेखनप्रवासाची सुरुवात कशी झाली याचे सुंदर वर्णन केले आहे. वडिलांच्या डायरी लेखनाच्या सवयीमुळे आपणास लेखनाची प्रेरणा मिळाली, हे आपण अत्यंत प्रामाणिकपणे मांडले आहे.

‘‘मावळतीचा रविराज’’ या लेखात आयुष्याचे सुंदर तत्त्वज्ञान मांडले आहे. उगवत्या सूर्यापासून मावळत्या सूर्यापर्यंत जसे बदल घडत जातात, तसेच जीवनातही चांगल्या-वाईट घटना घडत राहतात आणि त्या स्वीकारत पुढे जात राहणे आवश्यक असते, हा संदेश प्रभावीपणे व्यक्त झाला आहे.

‘‘धरले तर चावते सोडले तर’’ या लेखामध्ये मोबाईलचे फायदे-तोटे, त्याचा योग्य वापर आणि निसर्गाशी पुन्हा नाते जोडण्याची गरज याचे समर्पक विवेचन केले आहे. या लेखामध्ये आपण मार्गदर्शकाच्या भूमिकेत दिसून येता.

‘‘धूसर झाल्या पाऊलखुणा’’ या लेखात शेतीशी निगडित ‘‘खळ’’ या विषयाची माहिती दिली आहे. आजच्या पिढीला अपरिचित असलेल्या ग्रामीण जीवनातील अनेक गोष्टी आपण जिवंत केल्या आहेत.



‘‘गवताची गंज’’ या लेखात गंजीचे स्वरूप, उपयोग आणि ग्रामीण शेतीतील त्याचे महत्त्व सुंदररीत्या स्पष्ट केले आहे. ग्रामीण भागातील शब्दसंपदा आणि जीवनपद्धती जतन करण्याचे काम आपल्या लेखणीतून घडताना दिसते.

‘‘धुक्यातले चांदणे’’ या ललित लेखसंग्रहात विविध विषयांवरील लेखांचा समावेश असून त्यामध्ये मार्गदर्शन, ग्रामीण संस्कृती, नातीगोती, समाजप्रबोधन आणि जीवनमूल्ये यांचा सुंदर संगम आढळतो. या ठिकाणी काही निवडक लेखांचा उल्लेख केला असला तरी संपूर्ण कथासंग्रह वाचनीय आणि संग्रहणीय आहे.

आपल्या पुढील साहित्य प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

पुस्तकाचे नाव - धुक्यातले चांदणे

प्रकाशन - पलपब प्रकाशन अहमदाबाद

आवृत्ती - प्रथम पृष्ठे -१९८

समीक्षक - श्री. लक्ष्मण शिंदे सर (निवृत्त वन अधिकारी, निसर्ग कवी)

लेखिका - सौ वैशाली चंद्रकांत महाडिक सातारा

# भारत नरक नव्हे तर भूतलावरील संस्कृतीचा स्वर्ग

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

तेथील मनोरंजन उद्योगात सुद्धा भारतीय प्रसार माध्यमांची मोठी क्षमता आहे, पण या सर्व बाबीकडे दुर्लक्ष करून भारताला नरक संबोधने म्हणजे स्वतःच्या पायावर दगड टाकून घेण्यासारखे आहे हे ट्रम्प यांना कसे कळत नाही हा खरा प्रश्न आहे.

भारताला नरक संबोधताना त्यांनी इथल्या निसर्ग नद्या पर्वतराजी याकडे दुर्लक्ष केले इराण मधून एक व्हिडिओ प्रसारित करण्यात आला त्यामध्ये महाराष्ट्रातील पश्चिम घाटाचे अनुपम निसर्ग सौंदर्य दाखविले आहे एकदा ट्रम्प यांनी भारत जरूर पहावा म्हणजे त्यांना सुद्धा मार्क चे महत्व कळेल सारा जगप्रवास केल्यावर मला कुठला देश पुन्हा पहावा वाटतो तर तो भारत असे मार्क क्वेन म्हणाले

भारत ही स्वप्न भूमी आहे, मानवी संस्कृतीचा पाळणा आहे, इतिहासाची जननी आहे. भारत हा देश धर्माच्या बाबतीत लक्षाधीश आहे असेही त्यांनी संबोधले. भारत हा देश भाषेचे उगमस्थान, इतिहासाची माता, दंतकथाची आजी आणि परंपरेची पणजी आहे असेही त्यांनी नमूद केले. धर्माच्या बाबतीत इतर सर्व देश कंगाल आहेत परंतु भारत हा एकमेव श्रीमंत देश आहे. सूर्य आपल्या प्रवासात भारतावर प्रसन्न आहे. भारताला महान बनवण्यासाठी मानवाने किंवा निसर्गाने कोणतीही कसर सोडलेली नाही. ९६ च्या जागतिक प्रवास दरम्यान त्यांनी लिहिलेला वृत्तांत द इक्वेटर या ग्रंथात आला आहे व त्यातील ३६ व्या प्रकरणात त्यांनी बनारस व भारताचे वर्णन केले आहे आणि पुन्हा देशाला पुन्हा भेट द्यावी असे विचारले असता भारत हा त्यांच्यासमोर एकमेव राष्ट्र आदर्श उभा राहिला.

पण ट्रम्प मात्र नेमके त्याला मुकले आहेत त्यांच्या अज्ञानाची कीव करावी वाटते.

स्थलांतरावर वरवंटा

सत्तेवर आल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी स्थलांतरावर बडगा उगारला. एकदा आग पेटवली की त्यात ओले सुके सारेच जळते या न्यायाने त्यांनी स्थलांतरितांना भीती दाखवण्यासाठी मेक्सिको, क्युबा सारख्या देशांना ताणले आणि विनापरवाना म्हणून




अनेक भारतीयांना हातात बेड्या घालून विमानाने परत पाठवले सक्तीने त्यांना ही एवढी अपमानास्पद वागणूक देणाऱ्या ट्रम्प यांचे हे लोकशाही प्रेम आहे काय? असा प्रश्न पडतो.

या स्थलांतरितांची रीतसर चौकशी झाली का? त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यापूर्वी नोटीसा बजावल्या का? किंवा ज्या देशातून ते आले होते त्या देशांना तशा सूचना दिल्या काय? असे अनेक प्रश्न पडतात. पण ट्रम्प महोदयांनी त्यातही निवडक देशांच्या नागरिकांचा अपमान करण्याचा सपाटा चालवला. ट्रम्प यांनी भारत विरोधी धोरण सोडून द्यावे आणि मुद्दाम भारतीयांची कोंडी करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे तीव्र पडसाद उमटतील आणि खुद्द अमेरिकेच्या अर्थकारणाला त्यामुळे लगाम बसू शकतो.

कुठे गेली उदार सहिष्णता

अमेरिकेत आलेल्या भारतीय व चिनी आशियाई नागरिकांवर ट्रम्प यांचा दात आहे त्यांनी परदेशस्थ नागरिकांना असलेल्या जन्मावर आधारित नागरिकत्वाचा हक्क काढून घेण्याचा निर्णय केला. सुप्रीम कोर्टाने हा निर्णय रद्दबातल ठरवला तेव्हा भारतीय व चिनी नागरिकांची संख्या वाढत आहे. त्यांच्या जन्मलेल्या मुलांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळत आहे म्हणून ट्रम्प यांनी बोटे मोडली आणि या देशांना नरक भूमी संबोधिले.




जोवर ते देश अमेरिकेसाठी घाम गाळत होते अमेरिकेला मोठे करत होते तेव्हा त्यांच्या श्रमाची आणि घामाची किंमत अमेरिकेला का वाटली नाही?

नासाचे उदाहरण घ्या किंवा सिलिकॉन व्हॅलीचे उदाहरण घ्या तेथील संपत्ती मध्ये वाढ करण्यात भारतीयांनी दिलेल्या योगदानाचे काहीच मूल्य नाही काय? आता तुम्ही त्या देशांना नरक संबोधता त्या देशांनी १९६० पासून गेल्या ७० वर्षात जे योगदान दिले आहे ते मातीमोल झाले काय? एवढा साधा विवेक सुद्धा ट्रम्प तात्यांना मुळीच नाही.

एकदा ते या देशांना नरक संबोधतात त्याचे कारण असे की त्यांना वाटते भारतावर टीका केल्यामुळे त्याचा शत्रू असलेल्या पाकिस्तानला गुदगुल्या होतील. दुसरे दिवशी लगेच टीकेचा आग डोंग उसळला असे पाहून ते मखलाशी असे करतात भारत आणि भारतीय मोठे आहेत तो एक मोठा देश आहे.

मग सोशल समाज माध्यम व्यासपीठवर व्यक्त केलेली मते खरी मानावयाची की दुसऱ्या दिवशी केलेली सारवासारव खरी मानावयाची हा प्रश्न पडतो.

अमेरिकेसारख्या लोकशाही राष्ट्राच्या पहिल्या नागरिकांनी ५००० वर्षाचा इतिहास असलेल्या तेजस्वी परंपरा लाभलेल्या दोन जगातील महान देशांना नरक संबोधणे म्हणजे इतिहासाचा विपर्यास होय. त्यांच्या सांस्कृतिक ज्ञानाची किव करावी वाटते, कारण मुक्ती आणि कृती यातील विसंगती याची खरी चिंता वाटणे कोण्याही लोकशाही प्रधान जीवन जगणाऱ्या माणसाला सहाजिक आहे पण ट्रम्प यांच्या जिभेला हाड नाही एवढेच खरे.

माय बापाला ही विसरले

आखाती युद्ध सुरू झाले तेव्हा इंग्लंड फ्रान्स जर्मनी, ऑस्ट्रेलिया हे सारे देश ट्रम्प यांचा पदर धरून युद्धात आपण होऊन उडी घेतील आणि त्यांच्या उदात्त कार्याला पाठिंबा देतील असे त्यांना वाटत होते पण झाले मात्र वेगळे तिकडे नाटो संघटनेनेही युद्धात भाग घेण्यास विरोध दर्शविला आणि युरोपियन युनियनने सुद्धा हात झटकले

यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी अशी मखलाशी केली की तुम्हाला तेल हवे आहे ना मग हार्मोजच्या खाडीत लढायला या आमच्याबरोबर लढा, मरा आणि मगच तुम्हाला आम्ही तेल देऊ.

बिचाऱ्या युरोपियन देशांची मोठी पंचायत झाली त्यांना रशियाकडून ही चपरा भेटत आहे आणि अमेरिका ही त्यांना लाथाडत आहे त्यांनी जावे तरी कुठे असा प्रश्न पडला.

भारत आणि युरोपियन युनियन मध्ये झालेला मुक्त व्यापार करार म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांच्या महम्मद तगलंकी धोरणाचा परिपाक होय.

आप घरी बाटा आणि बाप घरी बाटा या न्यायाने वैतागलेल्या युरोपीय देशाने एक सुरक्षित आसरा म्हणून भारताची निवड केली तर त्यात नवल ते काय.

दुसऱ्या महायुद्धकाळात लष्करी तळ असलेल्या ग्रीनलँडला अमेरिकेचे घटक राज्य बनविण्याचा एकच धडा का लावला आणि सगळे युरोपातील देश त्यांचा हाच सोडून पळाले तीच गोष्ट कॅनडाची. या देशाला २५ वे घटक राज्य करतो अशी धमकी दिल्यापासून कॅनडातील जनता एवढी वैतागली की त्यांनी सारा इतिहास सोडून देऊन भारताबरोबर मैत्रीचा हात पुढे केला. खरे तर अमेरिका हा देश युरोपातील जनतेने वसविलेला देश आहे कोलंबसने अमेरिकेचा शोध लावला आणि त्यानंतर नव्या जगात युरोपातील गुन्हेगारांना जहाजावरून अमेरिकेत पाठविण्यात येऊ लागले कमाल अशी या नागरिकांचेही शोषण होऊ लागले तेव्हा त्यांनी आम्हाला प्रतिनिधी द्या नाहीतर आमच्यावर कर लादू नका अशा घोषणा दिल्या आणि बोस्टन येथे इंग्लंड मधून आलेले चहाचे पेटारेच्या पेटारे समुद्रात टाकण्यात आले यालाच बोस्टन टी पार्टी म्हणतात. उदार लोकशाही मूल्ये अमेरिकेने इंग्लंड कडून घेतली सर्व युरोपाचे प्रतिनिधित्व एका भूमीवर अमेरिका करत आहे किंबहुना त्यामध्ये जगातील सर्व देशांच्या लोकांचा सहभाग आहे त्यामुळे प्राध्यापक हेन्री पार्क अमेरिकेला देशांचा देश आणि लोकांचे लोक असे संबोधतात त्यातूनच अमेरिकन सेल्फ म्हणजे अस्मिता विकसित झाली आहे पण ट्रम्प महोदयांना या इतिहासाचाही विसर पडला आणि त्यांनी स्थलांतरित म्हणून सर्वांना तुम्ही चालते व्हा असा एकच दोषा लावला. आज अमेरिकेतील एकूण पाच कोटी १६ लाख लोकांपैकी ३०% लोक अमेरिका लाख भारतीय अमेरिका सोडायला तयार आहेत, मग तेथील शिक्षण अवकाश संशोधन लहान-मोठे उद्योग माहिती तंत्रज्ञान कृत्रिम प्रज्ञा या उद्योगांना चालविणारा कोण असा प्रश्न पडतो. **(क्रमशः)**

# हुशार फुलवंती

बबली:-आजी मी आता मोठी झाली आहे, मी सहावी मध्ये जाणार आहे, मला एकटीला तू का बाहेर जाऊ देत नाहीस?

आजी: अगं बबली, तुझे आई बाबा तू लहान असताना एका अपघातात गेले, तेव्हापासून मी तुझी आई, तुझे, बाबा आणि तुझी आजीही आहे. तुझी आई, बाबा व आजी म्हणून तुझी सगळी काळजी शिक्षण, कपडे, खाणे पिणे आणि तुला खूप शिकवून मोठे करणे हे माझेच काम व ध्येय आहे.बेटा, तू लहान मुलगी आहेस. त्यात तू सुंदर आहेस.

आपल्या आसपास असणारी अनोळखी लोक सगळीच चांगल्या विचारांची असतील असे मुळीच नसते. व वाईट

विचारांच्या लोकांची नजर चांगली नसते. ते वाईट काम करत असतात.

बबली: आजी लोकांची नजर म्हणजे काय गं?

आजी: अंग बबले, त्यांची नजर वाईट आहे, म्हणजे ते कोणत्याही मुलीला, बायकांना वाईट विचार करून बघत असतात, ते कुठल्याही पद्धतीने छळू शकतात.

बबली : कुठल्याही पद्धतीने म्हणजे काय गं आजी?

आजी: अंग बबले, अशी. वाईट नजरेची माणसं मानसिक किंवा शारीरिक त्रास देऊ शकतात, कुणालाही मारू शकतात. म्हणून मी तुला एकटी

सोडत नाही. तू अजून लहान आहेस.

बबली: आजी ती लोक अशी का वागतात? त्यांना त्यांची आई, बहीण बायको, मुलगी नसते का?

आजी:- अंग बबले, किती प्रश्न करते आहेस? अगं ती लोक इतरांना काय? आपल्याच आई, बहीण, बायको, मुलगी कोणालाही त्रास देऊ शकतात, मारू शकतात, अगं ती माणसं असली ती राक्षसी वृत्तीची लोक असतात.



बबली : आजी म्हणून तू मला कराटेचा क्लास लावला आहे का? अश्या लोकांना बदडून काढायला?

आजी: बबले, बेटा कठीण परिस्थितीत आपली सुरक्षा आपल्याला करता आली पाहिजे. आपल्या बुध्दीचा वापर करून अडचणींना तोंड देता आले पाहिजे. म्हणून तुला मी सारं शिकवत असते. कराटे क्लास ही लावला आहे.

बबली : आजी अशी एखादी गोष्ट सांग ना?

आजी: बबले, ऐक.

तुझ्याच वयाची एक गोड मुलगी होती फुलवंती. तिची आजी आणि ती मंदिरासमोर फुले विकत असत.

फुलवंती, फुलासारखी छान प्रसन्न आणि सुंदर होती. एकदा एका माणसाने तिला मला ताजी फुले पाहिजेत म्हणून दूरच्या बागेत नेले. तिची आजी एका पायाने अधू होती.

फुलवंती आजीला म्हणाली, आजी मी पटकन या दादांना ताजी फुलं घेऊन येते, बागेतून. आजी, अगं फुलवंती म्हणेपर्यंत फुलवंती तिकडे गेली तिकडे तिच्या सोबत तो माणूस ही गेला. तो खूप वाईट होता. त्या बागेत त्या वेळी कुणीच नव्हते.त्या माणसाने त्या फुलवंतीचा हात धरला आणि तिला म्हणाला, तू खूप छान दिसतेस. तिचे गालगुच्चे घेतले. तिच्या आजीने तिला सांगून ठेवले होते की कुणी अनोळखी माणसाने असे काही केले, आपल्याला स्पर्श केला की तो चांगला माणूस नसतो. तेथे आपली बुद्धी वापरून आपली सुटका करून घ्यायची असते. हे सारं त्या फुलवंतीला आठवले. तेथे एका झाडाजवळ ती दोघे आले असताना फुलवंतीने पाहिले खाली एक तिला उचलेल एवढा मोठा दगड होता.

ती त्या माणसाला म्हणाली, तुमच्या पायाखाली साप येतोय, साप,, तो माणूस घाबरला, कुठे आहे ?कुठे आहे? म्हणून मागे बघू लागला, इतक्यात फुलवंतीने तेथील तो दगड उचलून जोरात त्याच्या पायावर टाकला. आई ग, म्हणून तो ओरडला आणि तो माणूस तेथेच खाली बसला. तोवर फुलवंतीने आजीकडे धूम ठोकली. तेथे मंदिराजवळ असलेल्या सुरक्षा रक्षकाला सर्व सांगितले आणि तेथील काही लोक व सुरक्षा रक्षक त्या बागेजवळील झाडाजवळ आले, तेंव्हा तो व्यक्ती लंगडत निघाला असताना त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

अश्या रीतीने छोट्या फुलवंतीने आपल्या बुद्धीचा वापर हुशारीने करून त्या वाईट माणसाला अद्दल घडविली.

म्हणून बबले कोणत्याही अनोळखी व्यक्ती सोबत लहान बालकांनी एकटे कधीच जायचे नसते. ते कधी बालकांना चॉकलेट देतो, किंवा आणखी काही देतो, अशी लालुच दाखवून नेण्याचा प्रयत्न करत असतात.

बबली: आजी, किती छान गोष्ट सांगितली मला. मी कधीही कुणाही अनोळखी व्यक्ती सोबत बाहेर कुठेही जाणार नाही

आणि माझ्या साऱ्या मैत्रिणींना ही गोष्ट सांगेल. आजी: किती हुशार गं, माझी बबली

असे म्हणून आजीने तिच्या डोक्यावर मायेने हात ठेवला.

बोध:- कुठल्याही लहान मुलीने, मुलाने अनोळखी माणसा बरोबर कधीही कुठेही जाऊ नाही. मोठ्यांचे नेहमी ऐकावे.


**– गिरीश खं.वसेकर**
नांदेड सिटी,पुणे
९४२२६५९४००


# अगस्त्यची फुलबाग



वार्षिक परीक्षेचा निकाल लागला. सगळ्याच विषयात ए-प्लस, ए ग्रेड मार्क्स आल्यामुळे स्वारी जाम खुश होती. आता सुट्टीच्या दिवसात मोबाईलवर गेम खेळण्यात सुट्टीचे दिवस छान आणि मजेत घालवणार '' असे अगस्त्यने सर्वांना सांगितले.

सोसायटीतील मित्र-मंडळी खेळण्यासाठी दिवसभर त्याला बोलावण्यासाठी येऊ लागली, पण हा पोरगा मात्र मोबाईल स्क्रीनवरची नजर काढण्यास तयार नव्हता. तरी दोस्त मंडळी आरडाओरडा करून त्याला बळेच घेऊन जाऊ लागली तेंव्हा मात्र आई-बाबा, आबा-आजी अगस्त्यला म्हणू लागले- अरे असे सारखं मोबाईल हातात घेऊन पाहत बसू नको, थोडा वेळ तरी इतर गोष्टीत मन रमवावे, गप्पा-टप्पा, मित्रांच्या सोबत खेळ, मस्ती '' या गोष्टी सुट्टीत करणे म्हणजेच सुट्टी एन्जॉय करणे असते. पण अगस्त्यचे मन काही केल्या या इतर गोष्टीत रमत नव्हते. घरातली मोठी माणसे ओरडली की, तेवढ्यापुरते तो मोबाईल ठेवून देत, लोळत पडण्यात वेळ घालवू लागला.

एके दिवशी आजीने त्याला म्हटले-

अगस्त्य मला हेल्प कर ना प्लीज-!

जवळच्या नर्सरीमध्ये जाऊन आपण रोपटी आणू या, अगस्त्य म्हणाला-

माझ्या आवडीची रोपटी घ्यावी लागतील, तरच येईन मी.

आज्जी म्हणाली-

तसं तर तसं, तू सांगशील ती रोपटी घेऊ आपण

ठीक आहे ?

यस आज्जी, चला लगेच जाऊन आणू या फुलझाडे.

आज्जी मनात म्हणाल्या-

याला फुले आवडतात, बागेत जायला आवडते, त्याच्या या आवडीचा फायदा घेऊ, टेरेस बागेतील फुल-बागेचे काम

आत्ता सुट्टीच्या दिवसात अगसत्यवर सोपवायचे.

या कामात तो गुंतला म्हणजे त्याचा हातातून काही वेळ तरी मोबाईल सुटेल. बघू या काय होते ते.

सोसायटीजवळ एक छान नर्सरी होती, आजी सोबत तो नर्सरीत गेला. बाहेर सगळीकडे कडक ऊन पडले होते.

उकाड्याने हैराण होऊन गेलेले, पण नर्सरीत

हिरव्यागार , फुलांनी बहरलेल्या झाडांच्या समोर उभे रहाताच मन प्रसन्न झाले.आल्हाददायक थंड वातावरण होते.

लहान-मोठ्या कुंडीतली ती रोपटी जणू अगस्त्यला म्हणत होती-

ए अगस्त्य दादा-

आम्हाला घेऊन चल तुझ्या घरी, सुट्टीत आपण सोबत राहू.

अगस्त्यला फुलं खुप आवडीची-

लाल , पिवळी, नारिंगी, पांढरी शुभ्र, अशी विविध रंगातल्या नाजूक रोपट्यांची रांग पाहून मस्त वाटले, छोट्या-मोठ्या फुल-झाडांच्या कुंड्या,आणि स्टॅण्ड रांगेने ठेवलेल्या होत्या.

झाडांना पाणी देण्यासाठीची जाळीदार झारी अगस्त्यला भारी आवडली.

तो म्हणाला- आज्जी ही झारी घ्या, आजपासून सकाळ-संध्याकाळी या झारीने मी स्वतः झाडांना पाणी देणार आहे. हे काम मी एकट्याने करणार,

तुम्ही कुणी मध्ये-मध्ये करायचे नाही, ओके ?

आजी काही बोलल्या नाही, त्यांच्या मनातलेच जणू अगस्त्य बोलला, याचे त्यांना हसू आले.

मग काय,

लाल जास्वंद, गुलाबी गुलाब, पांढरा मोगरा, निळा गोकर्ण, कन्हेरी, स्वस्तिकची फुलं, नाजूक अबोली''

अशी फुलझाडांची फौज घेऊनच आजी आणि अगस्त्यची जोडी घरी आली.

बाग लावण्यात दोघांचा खूप वेळ गेला, यात हरवुन गेलेल्या अगस्त्यला मोबाईलची आठवण सुद्धा झाली नाहीये''

याचा जास्त आनंद त्याच्या घरातील सर्वांना होत होता.


**लेखक –अरुण वि.देशपांडे–पुणे**
९८५०१७७३४२


# अहंकारी राजाला धडा

एक अहंकारी राजा होता. त्याला आपल्या ऐश्वर्याचा आणि राज्याचा गर्व होता. तसेच आपली शक्ती आणि रूपावरही तो अहंगंड बाळगून असायचा. आपल्या बुद्धीचा टेंभा मिरवायचा. युद्धात जय मिळाला की त्याला गर्व चढायचा. आपल्यासमोर तो इतरांना तुच्छ लेखत असे. कोणाचा मुलाहिजा न बाळगता त्याचा तो अपमान करत असे. दुस-याला कमी लेखण्याचा त्याचा प्रयत्न असायचा. या कारणांमुळे लोक त्याच्यावर नाराज असायचे. त्याच राज्यात एका विद्वान पंडीताने त्याला वठणीवर आणण्याचे ठरविले. एके दिवशी तो पंडीत राजाच्या दरबारात गेला आणि राजाला प्रणाम केला. राजाने उद्दामपणे प्रतिनमस्कारही केला नाही उलट त्याने पंडीताला गर्वाने विचारले,''बोला पंडीत महाराज, तुम्हाला काय मदत पाहिजे. काय मागायचे असेल ते मागून घ्या, दान पाहिजे असेल तर दान घ्या किंवा धन पाहिजे, सोनेनाणे, जमीन, धान्य जे काही मागायचे ते तुम्ही माझ्याकडून मागून घ्या'' पंडीतजीने राजाकडे एकवार पाहिले व तो मोठमोठ्याने हसू लागला. राजाला व दरबारातील लोकांना पंडीताच्या हसण्याचे कारण काही कळेना, हसण्याचा भर ओसरल्यावर पंडीत म्हणाला,''राजन, तुम्ही मला काय दान देणार कारण तुमच्याकडे मला देण्यासारखे काहीच नाही.'' पंडीताचे हे बोलणे ऐकताच राजा संतापून लालबुंद झाला, राजाचे सैनिक पंडीताला मारायला धावून आले पण सेनापतीने सैनिकांना आवरले व पंडीताला पुढे काही बोलण्याची इच्छा आहे काय असे विचारले. त्यावर पंडीतजी म्हणाले,'' महाराज, जरा थंड डोक्याने विचार करा, तुमचा जन्मच मुळी तुमच्या इच्छेने झाला नाही, मग रूप, सौंदर्य आणि पराक्रम हे गुण तुम्हाला कोठून मिळाले असते. आईवडीलांनी तुम्हाला जन्म दिला म्हणून तुम्ही जन्माला आलात. तुमचे धान्यभांडार हे धरतीमातेचे देणे आहे. तिने पिकवून तिच्या लेकरांसाठी अन्न पुरविले म्हणून तुम्ही ते सांभाळत आहात आणि खजिन्याचे म्हणाल तर धन हे करातून आलेले म्हणजेच प्रजेचे देणे आहे, राज्य हे तुम्हाला वाडवडीलांकडून मिळालेले वरदान आहे राहता राहिले शरीरातील प्राण पण तेही तुमचे नाहीत ते सुद्धा ईश्वराची कृपा आहे हे सगळेच जर तुम्हाला दुस-याने दिलेले असेल तर तुम्ही मला काय म्हणून देणार आणि दिलेल्या गोष्टीचा काय म्हणून गर्व बाळगणार.'' एवढे बोलून पंडीताने राजदरबार सोडला व राजाने त्यादिवसापासून गर्व पण सोडून दिला,



तात्पर्यः- जे आपले नाही त्यावर गर्व बाळगणे व्यर्थपणाचे आहे.


# संस्कार

अनेक वर्षांपूर्वी बकुमार नावाचा कुख्यात दरोडेखार होऊन गेला. सिंधुराज राजाच्या राज्यात त्याने लोकांचे जगणे मुश्किल करून टाकले होते. तो श्रीमंतांना तर लुटत असेच, परंतु गरिबांनाही सोडत नसे. गोरगरीब शेतकरी, कामगारांनी आयुष्यभर कष्ट करून कमावलेले चार पैसे हडप करण्यास तो जराही संकोच बाळगत नसे. लोक त्याला हात जोडून विनवण्या करत असत. परंतु त्याला तो मुळीच भीक घालत नसे. अत्यंत निर्दयीपणे त्याचा लूटमारीचा धंदा सुरूच होता व त्याचे क्रौर्य दिवसेंदिवस वाढत होते. हजारो निरपराध लोकांच्या त्याने हत्या केल्या. जो कुणी त्याला विरोध करील, त्याला क्षमा करणे तर दूरच, त्यांना तो जिवंत सोडत नसे. सिंधुराज राजासमोर नागरिकांनी एकत्रितरीत्या बकुमारविरोधात तक्रार केली. त्यानंतर राजाने सगळी सेना त्या दरोडेखोराच्या मागावर सोडली. बकुमार अनेक महिने सैन्याला चकवा देऊन धुमाकूळ घालतच राहिला. परंतु त्याला पकडण्यात सैनिकांना एके दिवशी यश आलेच. त्याला राजासमोर हजर करण्यात आले. राजाने त्याला ताबडतोब फासावर लटकवण्याची आज्ञा दिली. बकुमारला झालेली शिक्षा ऐकून त्याचे अनेक नातेवाईकही त्याला येऊन भेटायला आले. त्याची आईदेखील त्याला भेटण्यास आली. परंतु आई सोडून तो सर्वांना भेटला. आईला मात्र त्याने भेट नाकारली. याचे कारण विचारले असता तो म्हणाला, 'लहानपणी मी सर्वप्रथम एक सुवर्णमुद्रा चोरली होती. ही चोरलेली मुद्रा मी आईला नेऊन दिली. त्या वेळी तिने माझी प्रशंसा केली, माझ्या पाठीवर शाबासकीची थाप मारली. जर तिने मला त्याच दिवशी फटकारले असते, चापट मारली असती तर हे दिवस पाहावे लागले नसते व मी दरोडेखोरही झालो नसतो.'

कथासार : पाया मजबूत आहे की ठिसूळ यावरच इमारत किती मजबूत असेल हे ठरत असते. तशाच प्रकारे मुलांवर लहानपणीच चांगले संस्कार केले गेले तर त्याच्या चांगल्या चारित्र्याचा पाया रचला जातो. वाईट संस्कार माणसाला अधोगतीच्या मार्गावर घेऊन जाण्यास कारणीभूत ठरतो.



### ♦ मनीमाऊ



मनीमाऊ मनीमाऊ
काय करते?
मनीमाऊ मनीमाऊ
बागेत जाते.
मनीमाऊ मनीमाऊ
भाजी चिरते.
मनीमाऊ मनीमाऊ
भाजी करते.
मनीमाऊ मनीमाऊ
पोळी लाटते.
मनीमाऊ मनीमाऊ
स्वयंपाक करते.
मनीमाऊ मनीमाऊ
खीर करते.
मनी आमची कामाची
सर्वांच्या आवडीची.


अलकानंतसूत श्रीपाद दसरे
छ.संभाजीनगर.
मो.9975950801



### कोकिळेचा तास

वर्गाच्या कौलात
चिमण्यांना पाहून
कोकिळेस वाटले
शिरावे वर्गात.......।।

झाडावरून ती
वर्गात शिरली
मंजुळ स्वरातून
गाऊ लागली....।।

कवितेचा तास
कोकिळेने घेतला
मुलांच्या गळी
छान उतरला....।

मुलांनी मग
धरला ताल
टोल पडला पण
नाही राहिले भान....।।




©®दत्ता तरलगट्टी
पंढरपूर


### 🌹बडबड गीत

ओळखा पाहू मी कोण...?

नीलू, सोनू, शौर्य, स्वरा,
प्रिन्स, ऋतू, राज आणि रानी,
नको फळा नको पाटी खेळ
खेळातूनी गावू सुंदर सुंदर गाणी.

हिरव्या हिरव्या रानी
टुणूक टुणूक उड्या मारुनी
लाल लाल भडक डोळे
दिसतात कसे गुंजेवाणी!
हिरव्या हिरव्या भाज्या,
कुरूम्म कुरुम्म गाजर
सांगा बरे खाते कोणी हम हम्म ....
सांगा सांगा कोण टाके मटकावूनी,
ओळखा पाहू मी कोण...? कोण...?

नदी किनारी, आंब्याच्या बनी
निळा, हिरवा, करडा
सुंदर पिसारा फुलवूनी,
काळया काळया ढगातूनी
विज गाते जेव्हा गाणी,
म्याव म्याव करूनी
आनंदाने डोलतो वनी.
ओळख माझी राष्ट्रीय पक्षी म्हणोनी
ओळखा ओळखा मी कोण..? ह्म्
हम्म !ओळखेल का मला कोणी..?

हिरवा हिरवा देठ हिरवी हिरवी पाने,
पांढऱ्या गुलाबी पाकळ्या पाकळ्या तुनी,
जन्म माझा होतं गढूळशा पाण्यातूनी.
प्रभाती ला उमलुनी मावळतीला
घेते पाकळी पाकळी ती मिटूनी.
पाहता मज मन जाते आनंदुनी
संबोधतात मला 'राष्ट्रीय फूल' म्हणोनी.
सांगा सांगा मी कोण..? हम्म..
ओळखलत का मला कोणी

जन्म माझा होतो कधी झुडुपावरुनी,
कधीतरी डोकावते सुंदर अशा
वेलीतूनी.
लाल, गुलाबी, पांढरा,
केशरी विविध अशा रंगातूनी,
पाहणाऱ्याचे मन सौंदर्याने
माझ्या टाकतो मी मोहवूनी .
वापर माझा होतो आर्युवेद
आणि सौंदर्यप्रसाधनातूनी .
'फुलांचा राजा' म्हणोनी,
फुललो का सांगा, बरे
तुमच्या विचारा विचारातुनी,
हम् हम्म...सांगा सांगा मी कोण...?
कोण ..कोण.. ओळखलत का मला
कोणी ?


©®सौ. वैशाली चंद्रकांत महाडिक
श्री क्षेत्र निनाम - सातारा
९७६७४३७९२३




### 🌹 फुलांच्या मध्ये...

फुलांच्या मध्ये
आहे काय पाहू
फुलपाखरांच्या
मागे मागे जाऊ

मंजुळाची गाणी
कोकिळेचा गळा
सा रे ग म प ध नी सा
नाचू सारे चला

तांदूळाचा भात घेऊ
चिऊताई साठी
चिऊ चिऊ बागडू
जाऊ तिच्या पाठी

चिंब गार पावसात
नाचू भिजू गाऊ
एक करून घेऊ
तुझा माझा खाऊ


@बलराज संघई...
9420015108
छत्रपती संभाजीनगर